**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी द्वारा ज्ञान भारतम् या डिजिटल पोर्टलचं उदघाटन.**
2. **राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष पदांसाठीचं आरक्षण जाहीर.**
3. **मनुष्य कल्याणासाठी ब्रह्मकुमारीज संस्थेचं काम महत्वपूर्ण असल्याचं सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं प्रतिपादन.**
4. **नागपूर जिल्ह्यात सेवा पंधरवाड्यात शासकीय सुविधांवर आधारित सेव्हन स्टार महसूली गाव अभियान राबविणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

ज्ञान भारतम

पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्ञान भारतम विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेला संबोधित करणार आहेत. तत्पूर्वी त्यांनी ज्ञान भारतम या डीजिटल पोर्टलचं उदघाटन केलं. हस्तलिखितांचं डिजिटायझेशन, जतन आणि सार्वजनिक सहभागाला गती देण्यासाठी ज्ञान भारतम या डजिटल पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. हस्तलिखित वारशाच्या माध्यमातून भारताच्या ज्ञानाचा वारसा पुन्हा मिळवणं, ही या परिषदेची संकल्पना असून, कालपासून या परिषदेची सुरुवात झाली. देशोदेशीचे विद्वान, संवर्धनवादी, तंत्रज्ञ आणि धोरण तज्ज्ञ या परिषदेत सहभागी झाले आहेत.

उपराष्ट्रपती पदाची शपथ

देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पदाची शपथ घेतली. नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राधाकृष्णन यांना शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, यांसह जगदीप धनखड, हमीद अन्सारी, एम वेंकय्या नायडू हे माजी उपराष्ट्रपती, तसंच अनेक केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. उपराष्ट्रपतींनी आज राज्यसभेच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही स्वीकारला. दरम्यान राधाकृष्णन यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या महाराष्ट्र राज्यपाल पदाचा तात्पुरता कार्यभार गुजरातचे राज्यपाल  आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

NPCI

भारतीय राष्ट्रीय पेमेंट्स कॉर्पोरेशन-NPCI नं व्यक्ती ते व्यापारी या प्रकारातील युपीआय व्यवहारांची मर्यादा दहा लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. येत्या १५ तारखेपासून हा बदल लागू होईल. मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर मर्यादा असल्यामुळे ग्राहकांना व्यवहार विभाजित करून, किंवा धनादेश, बँक ट्रान्सफर यांसारख्या पारंपरिक पद्धती वापराव्या लागत होत्या, अशा क्षेत्रांना या निर्णयामुळे लाभ होणार आहे. मात्र, व्यक्ती ते व्यक्ती व्यवहारांची मर्यादा १ लाख रुपये प्रति दिवस अशी पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे.

जीएसटी

वस्तू आणि सेवाकर आता फक्त 5 टक्के आणि 18 टक्के अशा दोन स्तरात आकारले जाणार आहे. यामुळे गृहिणींनी विशेष आनंद व्यक्त केला आहे. अश्याच एका गृहिणीचे मनोगत आपण ऐकुया -

***(होल्ड बाईट १८ सेकंद)***

***रोजच्या वस्तू त्या किचन मधल्या त्या स्वस्त झाल्या असल्यामुळे त्याच्यात एक आनंदाची लहर आहे आणि ज्या घरच्या ज्या महिलांच्या उत्पादन असतात त्या पण छोटे छोटे त्यांचे स्वप्न असतात. घरांचे सामान इलेक्ट्रिक सामान घेण्यासाठी ते आपण आता त्या घेऊ शकतील जसं आमचं पण स्वप्न होतं, कार घेण्याचा तर आम्ही पण लवकरच कार घेण्याचा निश्चित करतोय.***

ॲग्रोव्हिजन

विदर्भातील शेतकरी आत्महत्या कमी व्हाव्या यासाठीच ॲग्रोव्हिजन सारखी संकल्पना अस्तित्वात आली असून, ॲग्रो व्हिजनला कोणतीच जात, धर्म' विचारधारा नसून, हे कृषी प्रदर्शन सर्व शेतकऱ्यांसाठी खुले आहे असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. "ॲग्रोव्हिजन २०२५" हे कृषी प्रदर्शन दिनांक २१ ते २४ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित केलं जाणार आहे. त्यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत गडकरी बोलत होते. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत या कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन होणार असल्याचं गडकरींनी सांगितलं. यंदाचे ॲग्रोव्हिजनचे १६ वे वर्ष असून शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे ते म्हणाले -

***पहिले आपण 21 ते 24 नोव्हेंबर आहे. याला जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या चार दिवसात विज़िट करावं आणि त्यांच्या उपयोगाचे जे वर्कशॉप आहे. त्यात त्यांनी यावं अशी आपल्या आमच्या मार्फत आपण सगळ्यांना विनंती करावी हे आपलं सोळावं वर्ष आहे. पंजाबराव देशमुखांच्या नावाने साडे चारशे कोटी रुपयांचा ॲग्रो कन्व्हेन्शन सेंटर देवेंद्रजींनी आपल्याला दिला आणि आज आपण ते मोठ्या प्रमाणात करतो आहे. त्याच्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे काम आहे.***

जिल्हा परिषद आरक्षण

राज्यातील 34 जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांसाठी आरक्षणाची यादी आज जाहीर करण्यात आली. जाहीर यादीनुसार विदर्भात बुलढाणा, यवतमाळ यांसह नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग खुला ठेवण्यात आला आहे. यामध्ये अमरावती, गोंदिया, गडचिरोली यांसारख्या जिल्ह्यांत सर्वसाधारण - महिला- आरक्षण लागू करण्यात आलं आहे. अनुसूचित जातीसाठी वर्धा आणि चंद्रपूर (महिला) ही पदे आरक्षित करण्यात आली आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी अकोला आणि वाशिम या जिल्ह्यांतील अध्यक्षपदे राखीव ठेवली गेली आहेत. हि दोन्ही पदे महिलांसाठी राखीव आहेत. ओबीसी मागास प्रवर्गासाठी नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

ब्रह्माकुमारीज्/मोहन भागवत

भाऊ- बहीण असा बंधूभाव सर्वांमध्ये असला पाहिजे. त्यामुळे आपुलकीची भावना बळावते आणि वाद कमी होतात कारण बंधुभाव स्वार्थाला गिळून टाकतो. स्वार्थ हा उपद्रवी आहे. व्यक्तीच नाही तर राष्ट्रा राष्ट्रांमधील वाद देखील या स्वार्थातून उद्भवले आहेत" असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं. नागपुरातील वर्धा रोड स्थित ब्रह्माकुमारीज् विश्व शांती सरोवर स्थापनेच्या सातव्या वर्धापन दिन सोहळ्यात भागवत बोलत होते. वसुधैव कुटुंबकंम हे तत्व आपण जाणतो त्यामुळे विश्व कल्याणासाठी भारताने प्रबळ होण्याची गरज भागवत यांनी मांडली. भारतात मनुष्य कल्याणासाठी विविध प्रवाह कार्यरत आहेत त्यांपैकी ब्रह्मकुमारीज संस्थेचं काम महत्वपूर्ण आहे असं भागवत म्हणाले. सुमारे 1 लाख 11 हजार 500 चौरसफूट क्षेत्रात पसरलेल्या जामठा स्थित ब्रह्माकुमारीज् ईश्वरीय विश्व विद्यालयाचे

आध्यात्मिक प्रशिक्षण केंद्र म्हणून विश्व शांती सरोवराची 2018 साली स्थापना करण्यात आली होती.

राष्ट्रपती निमंत्रण

आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांना बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव इथं नोव्हेंबर महिन्यात आयोजित राष्ट्रीय आरोग्य महामेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासंदर्भातील निमंत्रण दिले आहे. काल दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात भेट घेऊन होऊ घातलेल्या कार्यक्रमाची माहिती राष्ट्रपतींना देण्यात आली. आयुष मंत्रालयातर्फे आयोजित या राष्ट्रीय पातळीवरील या महाआरोग्य मेळाव्याचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा-रिग्पा आणि होमिओपॅथी या भारतीय पारंपरिक पद्धतींची समृद्ध परंपरा, त्यांची वैज्ञानिक मीमांसा आणि जनकल्याणकारी स्वरूप जनतेसमोर सादर करणे होय.

रामटेक शेतकरी मेळा

देशातील नवनवीन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान आजच्या किसान समृध्दी मेळा इथं उपल्बध करून देण्यात आले असून रामटेक सह नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्याची माहिती करून घ्यावी आणि शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामटेक इथं केलं. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागमार्फत रामटेक येथील नेहरू मैदान इथं आज सकाळी किसान समृध्दी मेळावा तथा कृषी प्रदर्शनीचे भव्य आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उदघाटन अध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर, राज्यमंत्री आशिष जैसवाल आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

महिला आयोग आपल्या दारी’

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत नागपूर जिल्हयातील तक्रारींची जनसुनावणी येत्या १८ सप्टेंबर रोजी सदर येथील जिल्हा नियोजन भवनात सकाळी ११ वाजता होणार आहे. आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर तक्रारींची सुनावणी घेणार आहेत.जिल्ह्यातील अन्यायग्रस्त, पीडित महिलांनी पुढे येवून या जनसुनावणीचा लाभ घ्यावा असं आवाहन आयोगातर्फे करण्यात आलं आहे.

सेव्हन स्टार महसूली गाव

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन 17 सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक 2 ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण राज्यभर सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. या कालावधीत नागपूर जिल्ह्यात शासकीय सुविधांच्या प्रभावी अंमलबजावणीवर आधारीत सेव्हन स्टार महसूली गाव अभियान राबविले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली. यामध्ये प्रत्येक गावासाठी पाणंद रस्ता, पात्र असलेल्या गरजूंना पट्टे वाटप, अर्धन्यायिक प्रकरणासंदर्भात स्थानिक पातळीवरच सुलभ न्यायनिवाडा व्हावा यासाठी विशेष लोक अदालत, गरजूंना प्रमाणपत्र वाटप, तक्रार निवारणातून समाधान दिवस, जिवंत सातबारा तसच फेरफार, संजय गांधी निराधार योजनेतून अधिकाधिकांना न्याय या सात कार्यक्षेत्रांवर केलेल्या कामांचे मूल्यमापन करुन अशा गावांना सेव्हन स्टार महसूली गाव म्हणून जाहीर केले जाईल, असं जिल्हाधिकार्यांनी सांगितलं.

चार पदरी उड्डाणपुल

केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी आज संध्याकाळी नागपूर शहरातील नागपूर-अमरावती महामार्गावरील बोले पेट्रोल पंप इथं आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत चार पदरी उड्डाणपुलाचे उद्घाटन करतील. १९१ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला २.८५ किलोमीटर लांबीचा चार पदरी उड्डाणपुलामुळे नागपूर विद्यापीठ परिसर चौक नागपूरमधील प्रादेशिक वाहतूक कार्यालय-आरटीओ जोडला जाईल.

दिव्या देशमुख

फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर निहाल सरीन यानं इराणच्या परहम मगसूदलू वर विजय मिळवत साडेपाच गुणांची कमाई केली आहे. भारताच्या अर्जुन एरगेसीला हरवणाऱ्या जीएम मॅथियास ब्लूबॉम शी त्याने बरोबरी केली आहे. महिला विश्वविजेती दिव्या देशमुखला या स्पर्धेत वाईल्डकार्डद्वारे प्रवेश मिळाला असून गुकेशचा पुढचा सामना तिच्याबरोबर होणार आहे.

हवामान

येत्या काही तासांत संपूर्ण विदर्भात ठिकठिकाणी वीज आणि गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे वाशीम जिल्ह्यात ठिकठिकाणी हलका पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे.

****